| **Headline:** NSE wins Pride of Maharashtra Awards | |
|---|---|
| **Source:** Sakal | **Date:** 30 October2017 |

# राष्ट्रीय शेअर बाजाराचा गौरव

**मुंबई :** मुंबईतील वंचित मुलांच्या पुनर्वसनात सहकार्य करणाऱ्या राष्ट्रीय शेअर बाजाराला (एनएसई) नुकताच महाराष्ट्र गौरव पुरस्कार देण्यात आला. 'प्रोजेक्ट चुनौती' या उपक्रमात एकात्मिक आणि सधन समुपदेशन, शिक्षण आणि मूलभूत जीवन कौशल्य प्रशिक्षणातून विशेष सक्षम मुलांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. अडीच वर्षापासून 'एनएसई' प्रोजक्ट चुनौतीशी संलग्न असून, पुढील पाच वर्षे हा उपक्रम सुरू राहणार आहे. या उपक्रमातील दिव्यांग मुले समाजातील सर्वांत असुरक्षित घटकांपैकी एक आहेत. ज्यांना गैरवर्तन, आघात, कुपोषण आणि अनेक प्रकारच्या अभाव व उपेक्षांचा त्यांना सामना करावा लागतो, असे 'एनएसई'चे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम लिमये यांनी सांगितले.